**श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांच्यामार्फत संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, जि. धाराशीव हे सर्व स्थावर व जंगम मालमत्तेसह कायमस्वरूपी महाराष्ट्र शासनास हस्तांतरीत करणेबाबत....**

---

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/प्र.क्र.५२(Part-२)/ई-१४७२४१७/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक:- १० जून, २०२६**

**वाचा** :-१) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८ जुलै, २०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.समिती-२०२५/प्र.क्र.५२/तांशि-४, दि.३० जुलै, २०२५.

३) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/तुळजाभवानी अभि. महा./२०२५/९९२, दि.२९ ऑक्टोबर, २०२५

४) मा.मंत्रिमंडळाच्या दि.०५ मे, २०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णय.

**प्रस्तावना** :-

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर या सार्वजनिक विश्वस्त संस्थेमार्फत श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हे विनाअनुदानित तत्त्वावर दि.१९ सप्टेंबर, १९८३ पासून चालविण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, धाराशीव यांनी सदर महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरीत करण्याबाबत दि.२६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या पत्रान्वये तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यानुषंगाने या संदर्भात मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८ जुलै, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीदरम्यान त्यांनी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठित करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संदर्भाधीन क्र.०२ येथील दि.३० जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली.

३. सदर समितीने या अभियांत्रिकी महाविद्यालयाची प्राप्त वस्तुस्थिती विचारात घेऊन, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तंत्रशिक्षण संचालनालयास दि.१७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या

पत्रान्वये सादर केला होता. सदर प्रकल्प अहवाल, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी निर्धारित केलेल्या मानकांचा विचार करून, त्याचप्रमाणे विधि व न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभाग, नियोजन विभाग व वित्त विभाग या विभागांशी सल्लामसलत करून, यांसदर्भातील प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मा.मंत्रिमंडळाच्या दि.०५.०५.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर या सार्वजनिक विश्वस्त संस्थेमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर शासनाकडे कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली.

यास्तव मा.मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर अभियांत्रिकी महाविद्यालय सर्व स्थावर व जंगम मालमत्तेसह कायमस्वरूपी शासनाकडे हस्तांतरीत करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर या सार्वजनिक विश्वस्त संस्थेमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर शासनाकडे कायमस्वरूपी हस्तांतरीत करण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

१) श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हे महाविद्यालयाच्या ७.१३ हेक्टर जागेसह, त्यावरील इमारत बांधकाम व इमारतीतील साहित्यासह विनामोबदला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सर्व चल व अचल मालमत्तेसह कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार, उच्चस्तरीय सचिव समितीच्या (HPC) मान्यतेने, ३०० प्रवेशक्षमतेस अनुसरून महाविद्यालयास एकूण ६० नियमित शिक्षकीय पदे तसेच एकूण ५८ शिक्षकेतर पदे (४९ नियमित शिक्षकेतर पदे व ०९ बाह्ययंत्रणेद्वारे) अशा एकूण ११८ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात येत आहे.

३) श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर द्वारा संचलित श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर हे महाविद्यालय जरी शासनाकडे हस्तांतरीत झाले तरी, सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाचे कर्मचारी म्हणून मान्यता देता येणार नाही. ते संस्थानचेच कर्मचारी राहतील. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या सेवा व शर्तीप्रमाणे त्यांचे वेतन व सेवानिवृत्ती आदी लाभांचा भार श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांचेवर राहील. त्यामुळे सदर महाविद्यालयातील सध्या कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शासकीय कर्मचारी म्हणून समावेशन होणार नाही. तथापि, महाविद्यालयाची विद्यमान पदे जशी रिक्त होतील, त्याप्रमाणे ती पदे शासनाकडून विहित कार्यपध्दतीने भरण्यास व सदर पदांच्या संपूर्ण आर्थिक दायित्वास व आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

४) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकांनुसार महाविद्यालयातील पदे असणे बंधनकारक आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या हस्तांतरणानंतर व उच्चस्तरीय सचिव समिती (HPC) ने मान्यता दिल्यानंतर, सद्यस्थितीत जी शिक्षकीय पदे रिक्त आहेत, ती पदे शासनाकडून विहित कार्यपध्दतीने भरण्यास व सदर पदांच्या संपूर्ण आर्थिक दायित्वास व आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

५) उच्चस्तरीय सचिव समितीच्या (HPC) मान्यतेनंतर, नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या महाविद्यालयातील नियमित शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन याकरीता येणाऱ्या आवर्ती खर्चास तसेच, इतर दायित्व इ. साठी येणाऱ्या खर्चास संबंधित लेखाशिर्षाखाली मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर महाविद्यालयामध्ये नियुक्त करण्यात येणाऱ्या तासिका तत्वावरील (CHB) शिक्षकीय पदांकरीता येणाऱ्या खर्चास देखील मान्यता देण्यात येत आहे.

७) श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण, जंगम संपत्तीचे हस्तांतरण, विद्यमान कर्मचारीवर्गाचे हस्तांतरण, प्रलंबित देयकांची जबाबदारी, न्यायालयीन प्रकरणांची जबाबदारी, कंत्राटी व तात्पुरत्या कर्मचाऱ्यांची सेवा समाप्ती, दुरुस्ती कामांची जबाबदारी, अतिरिक्त उपकरणांची खरेदी, हस्तांतरणानंतरची जबाबदारी या बाबीचा समावेश असलेला राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व अध्यक्ष, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान तथा जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्यादरम्यान परस्पर सहमतीने सामंजस्य करार (Memorandum of Understanding - MoU) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) स्थावर व जंगम मालमत्ता हस्तांतरणाची नोंदणी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या नावाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) सदर हस्तांतरणानंतर महाविद्यालयाचे नाव श्री. तुळजाभवानी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर (Shri. Tuljabhavani Government Engineering College, Tuljapur) असे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर हस्तांतरण प्रक्रिया पार पडेल त्या दिवसापूर्वीचे महाविद्यालयाचे संपूर्ण दायित्व संबंधित संस्थानवर राहील.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या निकषानुसार जे साहित्य/ उपकरणे उपलब्ध नाहीत ते उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थानची राहील.

४. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत खालील बाबींची पूर्तता करणे संस्थानास बंधनकारक राहील, त्यावरील अंदाजे रु.४१,३८,७९,१९९/- (एकेचाळीस कोटी अडतीस लाख, एकोणऐंशी हजार, एकशे नव्याण्णव रुपये) फक्त इतका संपूर्ण खर्च संस्थान करेल:-

(रुपयांत)

| अ.क्र. | बाब/तपशिल | खर्च |
|---|---|---|
| अ | सदर महाविद्यालयाच्या सर्व १६ इमारतींची दुरुस्ती | PWD अंदाजपत्रकानुसार अंदाजे रु. १,०८,९५,५१०/-) |
| ब | विद्युत यंत्रणा, पर्जन्य व छत जलसंधारण दुरुस्ती व नूतनीकरण | अंदाजे रु. २,०८,९५,८२१/- |
| क | प्रयोगशाळेतील उपकरणांची दुरुस्ती व नवीन उपकरण खरेदी | अनुक्रमे अंदाजे रु. ४,२८,५००/- आणि अंदाजे रु. १,५५,४३,३००/- |
| ड | फर्निचर दुरुस्ती व नवीन खरेदी | अंदाजे रु. ११,६०,०००/- |
| ई | ग्रंथालयासाठी नवीन पुस्तके, नियतकालिके व संगणक साहित्य | अंदाजे रु.१६,७२,६००/- |
| फ | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रलंबित देयके | अंदाजे रु. ३७,४१,७८,९७८/- |

तसेच लेखापरीक्षणाअंती वरील खर्चाव्यतिरिक्त अन्य काही दायित्व उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थानाची राहील.

५. सदर महाविद्यालयातील सद्य:स्थितीत कार्यरत कर्मचाऱ्यांची १७ व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ३९ अशी एकूण ५६ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत. या सर्व प्रकरणांच्या निकालाने उद्भवणाऱ्या संपूर्ण आर्थिक भाराचे दायित्व संस्थानचे राहील. याबाबतचे हमीपत्र संस्थानने सामंजस्य करारासोबत (MoU) सादर करणे बंधनकारक असेल.

६. सदर महाविद्यालय शासनास हस्तांतरीत करण्यापूर्वी मागील काही वर्षांतील आवर्ती व अनावर्ती (भांडवली) खर्चाचे सविस्तर लेखापरीक्षण प्रचलित शासकीय नियमांनुसार पात्र व प्राधिकृत लेखापरीक्षक / शासकीय लेखा यंत्रणेमार्फत करण्यात यावे. सदर विवरणपत्रामध्ये कोणतीही प्रलंबित देणी, दायित्वे किंवा आर्थिक बांधिलकी असल्यास त्यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच ती शासनावर हस्तांतरीत होणार नाहीत, याची नोंद स्वतंत्रपणे करण्यात यावी. याकरीता तयार करण्यात येणारे सविस्तर विवरणपत्र हस्तांतरण प्रक्रियेचा अविभाज्य भाग म्हणून सामंजस्य करार (MoU) सोबत अनिवार्यपणे जोडण्यात यावे.

७. सदर प्रस्ताव हा सर्वसाधारण धोरणात्मक निर्णय नसून प्रकरण-निहाय (Case-Specific) स्वरूपाचा आहे. संस्थानाचे पदसिद्ध अध्यक्ष जिल्हाधिकारी हे शासन प्रतिनिधी असणे, सामाजिक-धार्मिक संस्था व्यवस्थापन, स्थानिक शैक्षणिक गरज, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (सुधारणा) अधिनियम, २०२६ मधील तरतुदी आणि शिक्षणाची उपलब्धता अबाधित ठेवणे या विशिष्ट बाबींचा एकत्रित विचार करूनच सदर हस्तांतरणाची मान्यता केवळ या प्रकरणापुरती मर्यादित असून ती कोणत्याही प्रकारे पूर्वोदाहरण (Precedent) म्हणून ग्राह्य धरली जाणार नाही. भविष्यात ट्रस्टमार्फत चालविली जाणारी

अभियांत्रिकी महाविद्यालये शासनाकडे हस्तांतरीत करण्याचे कोणतेही प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येऊ नयेत.

८. 'विकसित महाराष्ट्र २०४७' च्या अनुषंगाने महाविद्यालयात Artificial Intelligence, Data Science, Cyber Security, Green Technology, Renewable Energy, EV Technology इ. आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत सकारात्मक विचार करावा. महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी National Board of Accreditation (NBA) व NIRF यांच्याकडून वेळोवेळी मानांकन प्राप्त करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही महाविद्यालयाने करावी.

९. सदरहू शासन निर्णय हा दि.०५.०५.२०२६ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०६१०१८२०१६०१०८ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.06.10 18:22:10 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्याक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन
८) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव/सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) जिल्हाधिकारी, धाराशीव (तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर)
१४) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
१५) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
१६) प्राचार्य, श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर
१७) निवडनस्ती (तांशि-४).